


महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 27 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 243 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# भाजपमध्ये पक्ष विस्ताराच्या हालचालींना वेग

## २९ हजार माथाडी कामगार भाजपात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** भाजपतर्फे पक्षाचा विस्तार आणि वाढीसाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. मुंबईतील भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात संजय निकम आणि पोपटराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी माथाडी कामगार युनियनच्या तब्बल २९ हजार माथाडी कामगारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. हा पक्षप्रवेश भाजप प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप – महायुती सरकार कामगारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी विविध प्रयत्न करीत आहेत. गेल्या काही महिन्यांत अन्य पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी आदींनी मोठ्या संख्येने भाजपमध्ये प्रवेश केला आहे. अद्यापही पक्ष प्रवेशाची सत्रे सुरूच आहेत. पक्षातील सदस्य संख्या वाढीसाठी ऑनलाईन पद्धतीने नोंदणीवरही भर देण्यात येत आहे.

मुंबईत मंगळवारी तब्बल २९ हजार माथाडी कामगारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश पार पडला. भाजपच्या विस्तारासाठी गेल्या अनेक दिवसांपासून चव्हाण यांची महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार संघटनेचे नेते संजय (बापू) निकम आणि पोपटराव पाटील यांच्याशी चर्चा सुरू होती. माथाडी कामगार युनियनमधील तब्बल २९ हजार कामगारांनी मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्याला कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज घोरपडे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



# सर्वच प्रभागांत बेकायदा बांधकामे नोटीसा मात्र तिघांनाच !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभाग समिती क्षेत्रात ७६९ बेकायदा बांधकामे असून त्यापैकी ६६३ बांधकामांची नोंद प्रभाग समितींच्या बीट निरीक्षकांनी बीट नोंदवहीत केल्याचे सांगत ती तोडण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी नुकतेच दिले आहेत. तसेच या बांधकामांप्रकरणी त्यांनी सहाय्यक आयुक्तांना नोटीसा बजावण्यास सुरूवात केली असून दिवा, मुंब्रा आणि कळवा या तीन प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. एकूणच सर्वच प्रभाग समितीत बेकायदा बांधकामे असताना केवळ तिघानाच नोटीसा बजावण्यात आल्यामुळे वेगवेगळ्या चर्चा पालिका वर्तुळात रंगल्या आहेत.

### बेकायदा बांधकाम प्रकरणी ठाण्यात तीनच सहाय्यक आयुक्तांना नोटीसा

ठाणे महापालिका क्षेत्रात करोना काळात मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे उभारण्यात आली. या बांधकामांच्या मुद्द्यावरून टिका होऊ लागताच पालिका प्रशासनाने या बांधकामांवर कारवाई सुरू केली होती. ही कारवाई रोखण्यासाठी राजकीय दबाव येत असल्याची चर्चा होती. हा विरोध झुगारत पालिकेने बेकायदा बांधकामांवर हातोडा मारला होता. दोन वर्षांपुर्वी ही कारवाई थंडावताच भुमाफिया पुन्हा सक्रिय झाले होते. विधानसभा अधिवेशनात बेकायदा बांधकामांचा मुद्दा उपस्थित झाला होता. यानंतर पालिकेने पुन्हा कारवाई सुरू केली पण, यानंतरही बेकायदा बांधकामे उभारणीचे काम सुरूच असल्याचे समोर आले होते.

दरम्यान, उच्च न्यायालयाने दिव्यातील ५४ बेकायदा इमारती तोडण्याचे आदेशे दिले असून यानंतर या बांधकामांना कोणाचा वरदहस्त याविषयी वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. असे असतानाच, ठाणे महापालिका क्षेत्रात सर्व प्रभाग समिती क्षेत्रात मिळून ७६९ अनधिकृत बांधकामे असून त्यापैकी ६६३ अनधिकृत बांधकामांची नोंद प्रभाग समितींच्या बीट निरिक्षकांनी बीट नोंदवहीत केलेली आहे.

ही सर्व बांधकामे, पक्की, अर्धी पक्की, कच्ची कोणत्याही स्वरुपाची असली तरी ती तत्काळ तोडून टाकावीत, असे आदेश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतेच दिले. हे तोडकाम करताना, पोलीस बंदोबस्त मिळाला नाही, स्थानिकांचा विरोध होता, दबाव आला अशा प्रकारची कोणतीही कारणे न सांगता अनधिकृत बांधकामांचे निष्कासन झाले पाहिजे. त्याची संपूर्ण जबाबदारी सहाय्यक आयुक्तांची राहील. त्यांना त्यासाठी आवश्यक ते सर्व मनुष्यबळ, यंत्रणा उपलब्ध करून दिली जाईल. त्यासाठी इतर आवश्यक सहकार्य परिमंडळ उपायुक्त करतील. मात्र, या कामात कोणतीही हयगय होऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

मात्र, बीट निरिक्षकांनी नोंदवहीत बांधकामांची नोंद केली. त्याचवेळी या बांधकामांवर कारवाई का झाली नाही, असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे. या बांधकामांप्रकरणी त्यांनी सहाय्यक आयुक्तांना नोटीसा बजावण्यास सुरूवात केली असून दिवा, मुंब्रा आणि कळवा या तीन प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. परंतु संपुर्ण पालिका क्षेत्रात सर्वच प्रभाग समितीत बेकायदा बांधकामे असताना केवळ तिघानाच नोटीसा बजावण्यात आल्या असून उर्वरित प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांना नोटीसा का नाही बजावण्यात आल्या, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. या संदर्भात ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्याशी संपर्क साधला असता, ही प्रशासकीय बाब असल्याने त्यावर अधिक बोलणे उचीत होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**ठाणे महापालिका क्षेत्रात करोना काळात मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे उभारण्यात आली. या बांधकामांच्या मुद्दयावरून टिका होऊ लागताच पालिका प्रशासनाने या बांधकामांवर कारवाई सुरू केली होती. ही कारवाई रोखण्यासाठी राजकीय दबाव येत असल्याची चर्चा होती. हा विरोध झुगारत पालिकेने बेकायदा बांधकामांवर हातोडा मारला होता. दोन वर्षांपुर्वी ही कारवाई थंडावताच भुमाफिया पुन्हा सक्रिय झाले होते.**



# अंबरनाथच्या नागरी समस्या त्वरित सोडवा अन्यथा आंदोलन

### - शिवसेनेचा नगरपालिकेला इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** अंबरनाथमधील नागरी समस्यांची त्वरित सोडवणूक न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेच्या वतीने नगरपालिकेला देण्यात आला. अधिकाऱ्यांना मोफत श्रवणयंत्र आणि चष्मावाटप करून आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. मुख्याधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा केल्यानंतर चष्मावाटप आंदोलन तूर्त मागे घेण्यात आले.

शहरातील पथदिवे, आरोग्य सुविधा तसेच अन्य नागरी समस्यांनी उग्र स्वरूप धारण केले आहे, त्याच्या निषेधार्थ शिवसेनेचे (शिंदे गट) पदाधिकारी विकास सोमेश्वर यांनी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना चष्मा आणि श्रवण यंत्रे देऊन प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी अनोख्या रितीने आंदोलनाचा इशारा प्रशासनाला दिला होता. मात्र विकास सोमेश्वर यांच्या आंदोलनापूर्वीच आज मंगळवारी मुख्याधिकारी अभिषेक पराडकर यांनी विकास सोमेश्वर यांच्याशी चर्चा केली. त्यांचे प्रश्न ऐकून घेतले आणि समस्यांचे येत्या 15 दिवसांच्या आत सोडवण्याचे आश्वासन मुख्याधिकारी पराडकर यांनी विकास सोमेश्वर यांना दिले.

शहरातील अनेक समस्यांबाबत नागरिक पालिकेत येतात. मात्र अधिकारी तत्काळ योग्य ती दखल घेत नसल्याचा आरोप विकास सोमेश्वर यांनी केला आहे. शहरातील स्ट्रीट लाईट, अनधिकृत बांधकामे, तसेच इतर नागरी समस्या याबाबत पालिका प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून देखील अधिकारी योग्य ती दखल घेत नसल्याने विकास सोमेश्वर संतप्त झाले होते. त्यामुळे नाईलाजाने पालिका अधिकाऱ्यांना मोफत श्रवण यंत्र आणि चष्मा वाटप करून आंदोलन करण्यात येईल असा इशारा सोमेश्वर यांनी दिला होता.

# नवीन बेकायदा बांधकाम आढळल्यास अधिकाऱ्यांचे निलंबन !

### आयुक्त इंदुराणी जाखड यांचे प्रभागांमध्ये पाहणी दौरे सुरू






दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - डोंबिवलीतील ६५ महारेरा प्रकरणातील बेकायदा इमारतींवर कारवाई करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. न्यायालयाचे आदेश असल्याने ६५ महारेरा प्रकरणातील बेकायदा इमारतींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सर्व प्रभाग साहाय्यक आयुक्तांना आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना केल्या आहेत. पालिकेच्या दहा प्रभागांमध्ये एकही नवीन बेकायदा इमारतीचे बांधकाम दिसता कामा नये. अशाप्रकारची बांधकामे प्रभागांमध्ये सुरू आहेत का हे पाहणीसाठी आयुक्त डॉ. जाखड यांनी प्रभागांमध्ये अचानक पाहणी दौरे सुरू केले आहे.

आयुक्त डॉ. जाखड यांच्या या अचानक पाहणी दौऱ्यांमुळे अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सोमवारी आयुक्तांच्या आदेशावरून टिटवाळ्यातील बेकायदा बांधकामांवरून साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांना निलंबित करण्यात आले. मुख्यालय, प्रभागातील अधिकाऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता आयुक्त प्रभागांमध्ये आपल्या वाहनातून फेरी मारतात.

दोन दिवसापूर्वी आयुक्तांनी डोंबिवलीत पालिकेच्या ग प्रभागात कोणत्याही अधिकाऱ्याला पूर्वसूचना न देता पाहणी दौरा केला. या पाहणीच्या वेळी आयुक्तांनी ग प्रभागात सुरू असलेल्या निर्माणाधीन असलेल्या काही इमारत बांधकामांची छायाचित्रे काढली. प्रभागातील सार्वजनिक स्वच्छतेची पाहणी केली. तीन ते चार छायाचित्रे काढलेल्या निर्माणाधीन इमारतींची छायाचित्रे नगररचना अधिकाऱ्यांना पाठवून ही बांधकामे पालिकेच्या बांधकाम परवानगीने सुरू आहेत का याची पडताळणी करण्यास सांगितले.

उपायुक्त अवधूत तावडे, नगररचनाकार शशीम केदार, ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत आणि पथकाने आयुक्तांनी काढलेल्या इमारत छायाचित्रांची ठिकाणे शोधून तेथील विकासकांकडून बांधकामांची माहिती घेतली. ती बांधकामे पालिकेच्या परवानगीने सुरू असल्याचे निष्पन्न झाले. ग प्रभागाचा पदभार स्वीकारल्यापासून साहाय्यक आयुक्त कुमावत यांनी प्रभागात एकही नवीन बेकायदा बांधकाम होणार नाही याची खबरदारी घेतली आहे.

**आयुक्तांची दुपारची पूर्वनियोजित बैठक संध्याकाळी घेण्यात आली. ६५ रेरा प्रकरणातील इमारती, मालमत्ता कर, स्वच्छता असे अनेक विषय या आढावा बैठकीत चर्चेला होते.**

**- माधवी पोफळे**
**जनसंपर्क अधिकारी**

### अधिकाऱ्यांना तंबी

मंगळवारी पालिका मुख्यालयात अधिकाऱ्यांबरोबर घेतलेल्या आढावा बैठकीत आयुक्त डॉ. जाखड यांनी डोंबिवलीतील ६५ महारेरा इमारतीसंदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपणास कारवाई करायची आहे. याप्रकरणी काही जण आव्हानात्मक याचिकेच्या तयारीत असले तरी तसे कोणतेही आदेश पालिकेला नाहीत. प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी ६५ महारेरा प्रकरणातील पहिले रहिवास नसलेल्या इमारतींवर कारवाई करावी. पोलिसांचे सहकार्य घेऊन उर्वरित इमारतींवर कारवाई करण्यासाठी योग्य नियोजन करावे, अशा सूचना आयुक्तांनी केल्या.

ठाण्यात केवळ तीनच सहाय्यक आयुक्तांना नोटीसा; संपुर्ण शहरात बांधकामे असताना केवळ तिघांच नोटीसा दिल्याने आश्चर्य व्यक्त

प्रभागात एकही नवीन बेकायदा बांधकाम यापुढे दिसता कामा नये, असे बांधकाम सुरू असल्याचे दिसल्यास संबंधित प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांना तात्काळ निलंबित केले जाईल, अशी तंबी आयुक्तांनी दिली. ६५ बेकायदा बांधकामे उभी राहत असताना त्यावर त्याचवेळी का कारवाई केली गेली नाही. त्यावेळी प्रभागांमध्ये साहाय्यक आयुक्त कोण होते, असे प्रश्न उपस्थित करून आयुक्तांनी अधिकाऱ्यांना घाम फोडला.

# मराठी पाट्यांवरून बदलापुरात मनसे आक्रमक

## मराठी भाषादिनी मराठी पाट्या न दिसल्यास काळे फासणार




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापुरात नव्याने सुरू करण्यात आलेल्या आणि काही जुन्या दुकानांवर अद्यापही मराठी पाट्या लावलेल्या नाहीत. मराठी पाट्यांच्या या मुद्द्यावर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या बदलापूर शाखेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. मराठी भाषादिनानिमित्त पाट्या मराठी न केल्यास त्या पाट्यांना काळे फासले जाईल, असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

बदलापुरात सध्या कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या वतीने अतिक्रमणांवर कारवाई करत रस्ते आणि पदपथ मोकळे केले जात आहेत. एकीकडे ही कारवाई सुरू असताना दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठी पाट्यांच्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेण्यास सुरूवात केली आहे. नुकतेच मनसेच्या वतीने शहरातील दुकानांमध्ये धडक दिली. यावेळी बदलापुरातील दुकानांवर असलेल्या मराठी पाट्यांच्या मुद्द्यावरून मनसैनिक आणि दुकानदारांमध्ये जोरदार वाद झाले. याच मुद्द्यावरून मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने त्यापूर्वी दुकाने आणि आस्थापनच्या पाट्या मराठीत करण्यासाठी मनसेने दुकानदारांना आवाहन केले आहे. बदलापूर शहरात अनेक दुकाने, आस्थापने आणि खाजगी कार्यालयांवर इंग्रजी भाषेत पाट्या लावण्यात आल्या आहे. या पाट्यांच्या विरूद्ध मनसेच्या महिला आघाडीने आक्रमक भूमिका घेत या दुकानदारांना इशारा दिला आहे. या पाट्या मराठीत करण्यासंदर्भात पत्र देत मराठी भाषा दिनाच्या दिवशी दुकानावर मराठी पाट्या दिसायल्या हव्यात, असे आवाहन मनसैनिकांनी केले आहे. दुकानांच्या पाट्या मराठीत न केल्यास त्यांना काळे फासले जाईल, असा इशारा मनसैनिकांनी यावेळी दिला. यावेळी दुकानदारांसोबत मनसैनिकांचे वादही झाले. यावेळी मनसेच्या महिला आघाडीच्या संगीता चेंदवणकर, नंदा पांढरे, चित्रपट सेनेचे गणेश पिल्लई आणि इतर महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

# मीरा -भाईदर दिवाणी न्यायालयाचे ८ मार्चला उद्घाटन

### - परिवहन मंत्री श्री प्रताप सरनाईक यांची माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मीरा -भाईंदरः (२६ फेब्रुवारी)** मीरा-भाईंदर येथील नव्याने बांधण्यात आलेल्या दिवाणी न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या शुभहस्ते ८ मार्च (शनिवार) रोजी संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह जिल्हा वकील संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.मीरा-भाईंदर शहराची लोकसंख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे तिथल्या लोकांना प्रशासकीय आणि न्यायालयीन कामकाजासाठी सातत्याने ठाणे शहरात जावे लागते. शहरातील नागरिकांचे जा -ये करण्याचे चार तास वाचावेत, तसेच अनावश्यक आर्थिक फटका देखील नागरिकांना बसू नये, याचा विचार करून या भागाचे लोकप्रतिनिधी आणि राज्याचे परिवहन मंत्री श्री . प्रताप सरनाईक यांनी सन २००९ पासून विविध प्रशासकीय व न्यायालयीन कार्यालये मीरा-भाईंदर शहरांमध्ये करण्यासाठी प्रयत्न सुरू केला होता. याचाच एक भाग म्हणून दिवाणी न्यायालय देखील मीरा - भाईंदर शहरांमध्ये असावे यासाठी ते पाठपुरावा सातत्याने करीत होते.

# गीतासार



श्रीभगवानुवाच काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३-३७ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, रजोगुणापासून उत्पन्न झालेला हा कामच क्रोध आहे. हा खूप खादाड अर्थात भोगांनी कधीही तृप्त न होणारा व मोठा पापी आहे. हाच या विषयातील वैरी आहे, असे तू जाण. ॥ ३-३७ ॥

धूमेनाव्रियते वह्निर्यथादर्शो मलेन च । यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३-३८ ॥

ज्याप्रमाणे धुराने अग्नी, धुळीने आरसा आणि वारेने गर्भ झाकला जातो, त्याचप्रमाणे त्या कामामुळे हे ज्ञान आच्छादित राहाते. ॥ ३-३८ ॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा । कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३-३९ ॥

आणि हे कुंतीपुत्र अर्जुना, कधीही तृप्त न होणारा हा कामरूपी अग्नी ज्ञानी माणसाचा कायमचा शत्रू आहे. त्याने मनुष्यांचे ज्ञान झाकले आहे. ॥ ३-३९ ॥

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते । एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ३-४० ॥

इंद्रिये, मन आणि बुद्धी ही या कामाचे निवासस्थान म्हटली जातात. हा काम या मन, बुद्धी व इंद्रियांच्या द्वारा ज्ञानाला आच्छादित करून जीवात्म्याला मोहित करतो. ॥ ३-४० ॥

## रेसिपी

### 'पंजाबी कढी पकोडा'



1/2 लिटर ताक,3 चमचे बेसन
2 लाल सुक्या मिरच्या,आले लसूण पेस्ट,लाल तिखट,हळद
1 मोठा कांदा,जीरे,राई,कढीपत्ता हिंग,ओवा- कोथिंबीर,तेल
चवीनुसार मीठ

**पकोडा बनवण्यासाठी साहित्य**

1 मोठा कांदा,आवश्यक वाटल्यास चिरलेला कोबी,बेसन
ओवा,लाल तिखट, हळद, तांदळाचे पीठ,आले लसूण पेस्ट, तेल,
चवीनुसार मीठ

**कृती**

प्रथम एका भांड्यात २-३ चमचे बेसन घेऊन त्यात आले लसूण पेस्ट,ओवा,लाल तिखट, हळद, मीठ घालून त्यावर अर्धा लिटर ताक घालून मिश्रण चांगले एकजीव करून घ्या.

नंतर गॅस चालू करून त्यावर एका भांड्यात ३ चमचे तेल गरम करून त्यात कढीपत्ता, जीरे, १ सुकी लाल मिरची,राई, हिंगाची फोडणी करून त्यात बारीक चिरलेला कांदा परतवून थोडा लाल सर झाला की त्यात बेसन ताकाचे मिश्रण ओतून सर्व मिश्रण एकजीव करून घ्या.

बेसनच्या गुठळ्या होऊ नये म्हणून सतत ढवळत रहा. वरून थोडे पाणी घाला. नंतर २-३ उकळ्या आल्या की वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून एकदा मिश्रण ढवळून वरून कसुरी मेथी घाला व गॅस बंद करा.

पकोडा बनवण्यासाठी प्रथम एका भांड्यात १ मोठा बारीक चिरलेला कांदा घेऊन, बारीक चिरलेला कोबी, आले लसूण पेस्ट, ओवा, जीरे, लाल तिखट, हळद, मीठ, आणि आवश्यक ते नुसार बेसन, थोडे तांदळाचे पीठ घालून मिश्रण एकजीव करून घ्या. आवश्यक वाटल्यास पाणी घाला.

आता दुसऱ्या बाजूला गॅस चालू करून एका कढईत तेल गरम करून त्यात वरील बेसन चे गोळे एक एक करून सोडा व दोन्ही बाजूंनी खरपूस होईपर्यंत तळून घ्या. व थोडे थंड झाले की वरील कढीत सोडा.कढीला पुन्हा वरून एकदा लाल सुक्या मिरची जीरे, लाल तिखट तेलाची फोडणी द्या.तयार पंजाबी कढी पकोडा... गरमागरम जीरा राईस बरोबर सर्व्हं करा.

# मराठीचे भवितव्य : आपली जबाबदारी

**मराठी भाषा ही एकमेव आहे**
**अलंकाराने समृद्ध**
**प्रगतीच्या वाटचालीत**
**तिच्या राहू सगळे कटिबद्ध**

भाषेच्या संवर्धनामध्ये भाषा निरनिराळी कामे करण्यासाठी सक्षम आणि लवचिक करणे ही सुद्धा एक महत्त्वाची दिशा आहे. त्यासाठी मराठी भाषेचे दरवाजे नवनवीन बदलांना कायम उघडे ठेवावे लागतील. ज्ञानासाठी इतर भाषांतील शब्द आपल्या भाषेत वापरणे म्हणजे अपराध आहे, असे समजण्याचे कारण नाही. फक्त २७ फेब्रुवारीलाच संपूर्ण महाराष्ट्रभर मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यानिमित्ताने मराठी भाषेच्या सद्यस्थितीबाबत चर्चा करणे महत्त्वाचे ठरेल. इंग्रजीचे आक्रमण आणि जागतिकीकरणाच्या झंझावातात मराठी भाषा आणि संस्कृती नष्ट होण्याची भीती सातत्याने व्यक्त होताना दिसते परंतु, आज जागतिक संदर्भातही मराठी भाषिकांची संख्या जास्त नसल्याने मराठी भाषेचा ऱ्हास होईल की काय असे दिसून येते. खरेतर आज मराठी भाषेच्या संवर्धनाचे अनेकानेक मार्ग खुले झाले आहेत. संगणकीय तंत्रज्ञानातही मराठी भाषा उपलब्ध झाली आहे. विविध ज्ञान शाखांमधील उपयुक्त ज्ञान सुद्धा मराठीत उपलब्ध होत आहे. या सगळयाला जोड हवी ती आपल्या निग्रहाची! समाजातील प्रत्येकाला विशेषतः महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी भाषेबद्दल रास्त अभिमान बाळगला पाहिजे. आणि तिची प्रगती तसेच जोपासना करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. भाषा संवर्धन करायची म्हणजे आपली भाषा हिरीरीने बोलायची, जास्तीत जास्त लोकांनी जास्तीत जास्त ठिकाणी ती भाषा बोलणे हा कोणत्याही भाषेचा संवर्धनाचा पहिला टप्पा आहे. भाषेच्या संवर्धनासाठी संख्यात्मक वाढ आणि वर्चस्व आवश्यक आहे. हिंदी आणि बंगाली उदाहरणावरून ते आपल्याला स्पष्ट दिसते. याबाबतीत मराठीची परिस्थिती आशादायक आहे. कारण आजच्या घडीला मराठी मातृभाषा असणाऱ्यांची संख्या वाढवण्याचा जोरदार प्रयत्न असणार आहे. त्यामुळे आपण मराठी बोलून दुसऱ्यांना पण मराठीत बोलायला सांगून आपली भाषा ही आपल्या भूमीत भक्कमपणे उभी राहिली पाहिजे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपली भाषा ही जगातल्या प्रमुख भाषांपैकी एक आहे. सर्व व्यवहार हे त्या भाषेत होणे महत्त्वाचे आहे ते आपण करू शकतो हा आत्मविश्वास व निश्चय असायला हवा. भाषा शिक्षण हा कुठल्याही भाषेच्या संवर्धनाचा महत्त्वाचा घटक असतो. भाषा शिक्षणासाठी शाळेची गरज भासते मात्र याबाबतीत महाराष्ट्रातील परिस्थिती चिंताजनक झाली आहे. मराठी शाळांची संख्या खूपच कमी असेल, तिच्यात वाढ करून मुलांना अद्ययावत शिक्षण देणे जरुरीचे आहे. शालेय वयातच मराठी भाषेतून शिक्षण देऊन मराठीबद्दल आत्मीयता वाढवली पाहिजे. घराघरात मराठीत बोलून मराठीची अस्मिता राखली पाहिजे. त्यामुळे लहान वयातच मुलांना मराठीबद्दल प्रेम निर्माण होऊन मोठे झाल्यावर तीच मुले मराठी भाषेचा झेंडा हाती घेऊन जगासमोर मराठीला मानाने उभे करतील. परंतु तसे न होता मराठीला कमी लेखले जाऊन इंग्रजी भाषेचा दर्जा वाढवला गेला. त्यामुळे सर्वत्र इंग्रजी भाषा वापरली जाऊन युवा पिढीला तिचा स्वीकार करणे भाग पडले. शिक्षणासाठी इंग्रजीसारख्या परक्या भाषेचा स्वीकार केल्याने मराठी भाषा धोक्यात आली आहे. मराठी माध्यमातून शिकलेले लोक पण मराठी टिकवतील ही कल्पनाही साफ चुकीची आहे. मराठी विरुद्ध इंग्रजी असा वाद न घालता मराठीच्या प्रगतीकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे, ही खरी गरज आहे. ती मराठी माध्यमाच्या शाळेत अगदी पहिलीपासून चांगले दर्जेदार इंग्लिश शिकवण्याची आणि प्रत्येक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दर्जेदार मराठी शिकवण्याची, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चांगली मराठी पुस्तके पुरवणी वाचन म्हणून लावली पाहिजेत. मुख्य म्हणजे प्रत्येक मराठी कुटुंबाने आपल्या मुलांना दर्जेदार मराठी साहित्य आपल्या घरात उपलब्ध करून दिले पाहिजे. मुलांना मराठीची गोडी लागावी म्हणून पालकांनी त्यांच्या वाढदिवसाला एक मराठी पुस्तक भेट द्यावे.

**मराठी भाषिकांनी**
**प्रयत्नांची धरून कास**
**घडवून आणू विकास**
**हाच अमुचा सर्वांचा**
**राहील ध्यास**

लेखक - लीना बल्लाळ

## मुरबाड मध्ये तिर्थक्षेत्र संगमेश्वर येथील

# महाशिवरात्रीला भाविकांची मोठी गर्दी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** ठाणे जिल्ह्यातील २०२ वर्षाची परंपरा असलेल्या तसेच सुप्रसिद्ध असलेली मुरबाड तालुक्यातील तिर्थक्षेत्र संगमेश्वर येथील महाशिवरात्रीला भाविकांची प्रचंड गर्दी पहायला मिळत आहे. यंदाही श्री क्षेत्र संगमेश्वर येथे सकाळी सहा वाजल्यापासून ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत दर्शनासाठी साठी रांगच-रांगा पाहायला मिळत होत्या. तसेच महाशिवरात्र निमित्त तालुक्यातील आजापर्वत, माळ मठ, खापरी मठ, देवघर मंदिर, पिंपळघर मठ, पाडले मठ, गोरख गड, पलिंदेश्वर खुटल, घोडदेश्वर मुरबाड, खाम लिंगेश्वर म्हसा, धानिवली मठ,या ठिकाणी हर हर महादेव ची मंदिर आहे त्या ठिकाणी भक्त भाविकांनी मोठ्या उत्साहात अभिषेक सोहळयाला उपस्थिती दर्शवली.



श्री क्षेत्र संगमेश्वर येथे भाविकांनी रांगेत उभे राहून दर्शन घेतले ची माहिती श्री क्षेत्र संगमेश्वरच्या ट्रस्टच्या वतीने दिली आहे.तर या श्री क्षेत्र संगमेश्वर येथे ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.एस.डी. स्वामी यांच्या नेतृत्वाखाली महाशिवरात्र निमित्त मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्या मार्गदर्शनाखाली येथे मोठ्या प्रमाणात कडक चौक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे येथे शांत वातावरणामध्ये भक्त भाविकांना दर्शन घेतला अशा प्रतिक्रिया येथील दर्शन घेताना भक्त भाविकांनी दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र संगमेश्वरच्या पाठोपाठ म्हसा येथे प्रसिद्ध व ऐतिहासिक असलेल्या शंभू महादेवाच्या मंदिरात सुद्धा सकाळपासून भक्त भाविकांच्या वतीने अभिषेक सोहळा पार तसेच मुरबाड शहरातील घोडकेश्वर, शिवळे, शिवले कॉलेज मठ, तसेच मुरबाड शहरातील डॉ नानासाहेब धर्माधिकारी तलाव शास्त्रीनगर या ठिकाणी महाशिवरात्रीनिमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती.

दोन ते तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेला हजारो भाविक येऊन श्री शंकराचे दर्शन घेतात व अभिषेक करुन आपली मनोकामना पूर्ण करतात. तसेच अनेक वर्षांपासूनची प्रथा असल्याने रायगड जिल्ह्यातील उरण येथील अनेक कुटुंब तीन दिवस आपले व्यवसाय सोडून तिर्थक्षेत्र संगमेश्वर येथे श्री शंकराची पुजा अर्चा करत असतात. शेवटी तिसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहाने महाशिवरात्रीची सांगता करताना वाजत गाजत पालखी सोहळ्याचे आयोजन करून एक प्रकारे नवस फेडण्यासाठी या वर्षाच्या यात्रेला निरोप देताना व पुढील वर्षी आम्हाला पुन्हा असे भाग्य कधी मिळणार असे मनोगत व्यक्त करताना भक्त भाविकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

# कविता जगण्याला बळ देते - डॉ. विनायक पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली:** जेव्हा कवी आपल्या भावना,अनुभव व्यक्त करत कवितेचे लेखन करतो आणि मग त्या कवितेला किंवा गाण्याला वाद्यांची साथ देऊन संगीत तयार होते त्या संगीताचा आपल्या मानसिक आरोग्यावरती सकारात्मक परिणाम होत असतो. आणि या कवितांमुळेच माणसाच्या जगण्याला बळ मिळते असं वक्तव्य चित्रपट गीतकार,कवी डॉ. विनायक पवार यांनी केले.जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे दि 25 फेब्रुवारी 2025 रोजी शैक्षणिक वर्ष 2024-25 मधील विद्यार्थ्यांचा ,कला क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा वार्षिक गुणगौरव समारंभ व स्नेहसंमेलनाचे आयोजन केले गेले होते. यावेळेस प्रमुख अतिथी म्हणून चित्रपट गीतकार, कवी प्रा.डॉ.विनायक पवार आणि सिने नाट्य अभिनेत्री धनश्री दळवी यांची विशेष उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना



वाव देत कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रा डॉ के बी.कोरे यांनी केले.उपस्थित मान्यवरांपैकी डॉ. पवार यांनी त्यांच्या कविता सादर करीत मनोरंजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर उपस्थित अभिनेत्री धनश्री दळवी यांनी देखील त्यांचे अनुभव , आठवणी सांगत विद्यार्थ्यांना पुढील भविष्यासाठी प्रोत्साहित केले. यावेळेस उपस्थित माजी विद्यार्थ्यांकडून विजेत्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करून विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना सादर करण्याची संधी दिली गेली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मराठी विभागातील प्राध्यापक आंतरराष्ट्रीय स्तरावरील लावणी कलावंत प्रा. महेश थोरात यांनी लाईव्ह लावणी सादर केली व या लावणीच्या ठेक्यावर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी विनायक पवार आणि धनश्री दळवी हे पण लावणीत सहभागी झाले.आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सतीश लकडे यांनी केले. यावेळेस जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे, उपाध्यक्ष शांताराम भोईर, अधिकारी कल्याण विश्वास गुजर, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष बाळू फुलारे, सुदाम पाटील ,न्यूज18 लोकमतचे वरिष्ठ निर्माता शंकर कांबळे,नेताजी भोईर, बाळाराम चौधरी, नारायण घरत, बाळाराम कोर ,शंकर भोईर, गणेश मलबारी, मिलिंद चंदने, सुनील सुरोशी, सुरेखा भोईर, सुरेश टेंभे, तुकाराम बुटेरे, दिपाली बुटरे, दिलीप बुटेरे, अनंत कोर, जितेंद्र भोईर , म्हसा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य माळी सर, भगवान भावार्थे, अ‍ॅड.जयेश मोहिते, विश्वास मिरकुटे, तसेच महाविद्यालयाच्या संचालिका स्मिता घोडविंदे ,संचालक प्रशांत घोडविंदे ,महाविद्यालयाचे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. प्रकाश रोहणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा महेश थोरात,सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि आजी माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

## श्री हनुमान सेवा समिती टिटवाळा

# महाशिवरात्री निमित्ताने भाविकांना फराळ वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** श्री हनुमान सेवा समिती टिटवाळा यांच्या वतीने महाशिवरात्री निमित्ताने माजी नगरसेवक यांच्या मार्गदर्शनाखाली शिवभक्तांना खिचडी वाटप करण्यात आली, टिटवाळा स्टेशन जवळ हनुमान मंदिर असुन बाजुलाच शिवलिंग पिंडी स्थापना करण्यात आली आहे, महाशिवरात्री निमित्ताने टिटवाळा परिसरातील असंख्य भाविकांनी सकाळ पासूनच दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती, दुधाने अभिषेक करुन बेळाचा पाने वाहुन दर्शन घेत होते,तसेच खास करुन शिवभक्तांन साठी केदारेश्वर गुहा मंदिर हरिश्चंद्र गड संकल्पना चित्र बनविण्यात आले आहे, यावेळी शिवभक्त तसेच हनुमान सेवा समितीचे सदस्य प्रदीप भोईर, गणेश भोईर, उमेश भोईर, बाळाराम पाटील, किरण अगस्ती, विशाल उघवेकर,तसेच हनुमान सेवा समिती, नरेंद्र महाराज संप्रदाय मंडळ, कलावती आई भजन मंडळ यांनी सहकार्य केले.



# 'स्वातंत्र्यवीर सावरकर' व 'डॉ.आनंदीबाई जोशी' यांना

## महानगरपालिकेतर्फे भावपूर्ण आदरांजली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** "स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर" व "डॉ. आनंदीबाई जोशी" यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रतिमेस माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी रेखा जाधव यांनी डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

महापालिका भवनातील स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर सभागृहातील ,स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या तैलचित्रास रेखा जाधव व महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.

या समयी उपस्थित शिक्षणाधिकारी विजय सरकटे, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार आणि सचिव विभागातील अधीक्षक मधुकर भोये तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर आणि डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या प्रतिमेस प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# पालघर जिल्ह्यातील तहसीलदारांना विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या नोंदी ठेवण्याचे आदेश द्या

## अनंता वनगा यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा या दुर्गम तालुक्यातील आदिवासी मजुर पालघर जिल्ह्यात रोजगारासाठी स्थलांतर होऊन मिळेल ते काम करण्यासाठी आपल्या कुटूबांसहित शहरी व शहरालगत असणाऱ्या भागात जाऊन काम करतात. त्यातच विटभट्टीवर जाऊन काम करणाऱ्या मजुरांची संख्या जास्त आहे. हे विटभट्टीवर काम करणारे मजूर आपल्या कुटुंबासह झोपड्या बांधून त्या ठिकाणी राहतात. परंतु विटभट्टी मालक त्याच्याकडे काम करणाऱ्या मजुरांची कुठलीही माहिती स्थानिक तहसीलदार कार्यालयात देत नाही. आई-वडिलांसोबत लहान मुलेही मजूर म्हणून काम करताना दिसत आहेत. एका-एका विटभट्टी मालकाकडे कमीत-कमी वीस ते पंचवीस मजूर तसेच त्यांची मुले काम करत असतात. मात्र प्रत्येक तालुक्यात किती विटभट्ट्या चालू आहेत व तिथे कुठल्या




तालुक्यातील कुठल्या गावातील किती मजूर काम करत आहेत. हे स्थानिक तहसीलदार आज रोजी सांगू शकत नाही. त्यामुळे विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांवर अत्याचाराच्या तसेच महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या किंवा लहान मुलांचे लैंगिक शोषण होऊन मृत्यू झाल्यास अशा दबाव तंत्राचा वापर करून तिथेच दाबण्याचे प्रकार होतात. त्यामुळे अशे प्रकार रोखण्यासाठी वाडा तालुक्यातील आदिवासी मुक्ती मोर्चा या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अनंता वनगा यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले, तसेच वाडा तालुक्यातील लोहपे येथील विटभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासी महिलेवर अत्याचार झाला होता, तसेच पिडीत महिलेच्या मुलीचा त्याच वेळी ट्रॅक्टरच्या टायराखाली येवून मृत्यू झाला होता. या घटनेचा संदर्भ देऊन पालघर जिल्ह्यातील गावोगावी असणाऱ्या विटभट्टी मालकांकडे काम करणाऱ्या मजुरांच्या संपुर्ण कुटुंबाची नोंद ठेवणे शक्तीचे करावे व या माहितीच्या आधारावर या मजुरांच्या कुटुंबीयांना रेशन धान्यांची सुविधा आरोग्याची सुविधा महिला व बालकांना पोषण आहार, अंगणवाडी, बालवाडीची सुविधा पुरवता येईल. तसेच एखादी अन्याय, अत्याचाराची घटना घडल्यास त्यावर त्वरित निवारण करणे सोपे जाईल, त्यामुळे पालघर जिल्ह्यातील तहसीलदारांना विटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या नोंदी ठेवण्याचे आदेश द्यावे अशी मागणी आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेच्या वतीने अध्यक्ष अनंता वनगा यांनी केली आहे.

# एचएसआरपीचे महाराष्ट्रात दर सर्वात जास्त का?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** केंद्रसरकार तर्फे सर्व खाजगी आणि सार्वजनिक वाहनांचे नंबर प्लेट बदलण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. जुन्या नंबर प्लेट काढून नवीन अति सुरक्षित पंजीकृत पाटी (हाई सिक्यूरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) लावण्याची सक्ती केली जात आहे. या करीता जे दर ठरविण्यात आलेले आहेत ते इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रात सर्वात जास्त आहेत.

याबाबत सार्वजनिक वाहन (रिक्षा-टैक्सी) धारकांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांच्याकडे आपली व्यथा मांडली. त्यानंतर रूपेश भोईर यांनी शिवसेना शहर प्रमुख सचिन बासरे, उपनेते अल्ताफ शेख, भिवंडी लोकसभा क्षेत्रचे संपर्क प्रमुख साईनाथ तारे, वाहतुक सेनेचे शहर अध्यक्ष निलेश भोर यांच्या बरोबर एक तातडीची बैठक घेतली आणि सर्वांच्या सहमतीद्वारे कल्याणचे उप प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी आशुतोष बारकुले यांना एक पत्र देऊन एचएसआरपीचे दर कमी करण्यासाठी विनंती केली.बारकुले यांनी सदर पत्र संबंधित विभागाला पाठविण्याचे आश्वासन दिले. ह्या बद्दल प्रसार माध्यमांशी बोलताना रूपेश भोईर यांनी सांगितले की आम्ही एचएसआरपी च्या विरोधात नाही, पण प्रत्येक वेळी केंद्र सरकार महाराष्ट्रा कडून इतर राज्या पेक्षा खूपच जास्त आर्थिक वसूली करायचे धोरण राबवते त्याला आमचा विरोध आहे. आम्ही ह्या विषया बद्दल राज्याचे परिवहन मंत्र्यांना सुद्धा लेखी पत्र दिला आहे. जर दर कमी नाही केले तर शिवसेना स्टाइलने आन्दोलन करण्यात येईल असा इशारा रूपेश भोईर यांनी दिली आहे.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवेदन देते वेळी रूपेश भोईर यांच्या सोबत वैभव भालेकर, अरशद शेख, विजय बोरे, संदीप पंडित, प्रशांत जाधव, रहिम चौधरी आणि इतर कार्यकर्ता उपस्थित होते.



# म्हारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी पुन्हा निलिमा म्हात्रे यांची नियुक्ती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील सर्वात मोठी व महत्त्वाची असलेल्या म्हारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी उच्चशिक्षित निलिमा नंदू म्हात्रे यांची पुन्हा नियुक्ती विभागीय कोकण आयुक्तांनी केली असून आज ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे यांनी त्यांच्या कडे पदभार सुपूर्द केल्यानंतर त्या 'भावूक, झाल्याचे दिसून आले. कल्याण तालुक्यातील महत्त्वाची समजली जाणा-या म्हारळ ग्रामपंचायत मध्ये ,एकुण सतरा सदस्य आहेत,तत्कालीन सरपंच निलिमा म्हात्रे यांनी मार्च२०२४ रोजी पदाचा राजीनामा दिला होता, परंतु



हे राजीनामा नाट्य इतके रंगले की ग्रामपंचायत, गटविकास अधिकारी, जिल्हाधिकारी व नंतर विभागीय आयुक्तांपर्यंत हा विषय पोहचला, आपल्यावर अन्याय झाल्याचे गृहीत धरून सौ म्हात्रे यांनी विभागीय कोकण आयुक्त यांच्या कडे गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, प्रभारी सरपंच व इतर १२सदस्यांच्या विरोधात अपील केले, तेथे दोन्ही बाजूच्या वकिली आप आपली बाजू मांडली, अखेरीस कोकण आयुक्तांनी सौ म्हात्रे यांचे अपिल मान्य करण्यात येवून त्यांचे सरपंच पद अबाधित राखले, त्यानुसार आज त्यांना रितसर सरपंच पदाचा कार्यभार ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे यांनी सुपूर्द केला, यावेळी सदस्यां नंदा म्हात्रे, मोनिका गायकवाड, अश्विनी देशमुख, वेदिक गंभीरराव, मंगलाताई इंगळे, बेबी सांगळे, प्रकाश चौधरी, विकास पवार, किशोर वाडेकर,यांच्या सह कल्याण पंचायत समितीच्या माझी सभापती, अरुणा वाढेकर, सुमनताई खरात, माझी उपसभापती, पांडुरंग म्हात्रे, माझी सदस्य डॉ सोमनाथ पाटील, निलेश देशमुख,प्रवीण देशमुख, नंदू म्हात्रे माझी सदस्या अर्चना पवार, पोर्णिमा म्हस्के, अनिल पवार आदी मंडळी उपस्थित होते, निलीमा म्हात्रे याची पुन्हा एकदा सरपंच पदि नियुक्ती झाल्याने त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, खासदार डॉ श्रीकांत शिंदे, आमदार कुमार आयलानी, किसन कथोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, प्रमोद हिंदूराव, डॉ सोमनाथ पाटील, सर्व सदस्य, माझी सभापती, यांचे सर्वांचे आभार मानून सर्वाच्या सहकार्याने गावाचा विकास करणार असल्याचे सांगितले,



## आरोग्य व्यवस्था बळकटीकरणावर
# नवी मुंबई मनपाचा भर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** यंदाच्या अर्थसंकल्पात शहरातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणावर आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी भर दिला आहे. योग्य व अचूक निदानाकरिता महापालिकेच्या रुग्णालयात २४ तास एमआरआय सुविधा बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यासह इतरही अनेक सुविधांवर या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. महापालिकेच्या वाशी येथील सार्वजनिक रुग्णालयातील क्ष-किरण विभागात 'क्ष-किरण तपासणी' व 'सीटी स्कॅन' सुविधा रुग्ण तपास, निदान करण्यासाठी वापरल्या जातात. रुग्णांना अधिक प्रभावी तपासणीकरिता तसेच अत्यवस्थ रुग्णांकरिता अचूक, योग्य निदानाकरिता एमआरआय सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत ही सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना खासगी सेंटरमध्ये जाऊन एमआरआय सुविधा उपलब्ध करुन घ्यावी लागते. ही सेवा काहीशी महागडी असल्याने रुग्ण त्या चाचणीस दिरंगाई करतात. त्यामुळे योग्य व अचूक निदानाकरिता महापालिकेच्या रुग्णालयात २४ तास एमआरआय सुविधा बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

### कर्करोग, डायलिसीससाठी विशेष कक्ष

केमोथेरपी : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कॅन्सरग्रस्त रुग्णांना केमोथेरपी उपचार सुविधा उपलब्ध करून देणेकरिता महापालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय, नेरूळ या ठिकाणी १० बेडचे 'डे केअर केमोथेरपी युनिट' सुरू करण्यात आलेले आहे. या व्यवस्थेचा विस्तार करता येईल का यासंबंधी चाचपणी केली जात आहे. ऐरोली तसेच नेरुळ या ठिकाणी बाहययंत्रणेव्दारे डायलिसीस सुविधा कार्यरत आहे. वाढती डायलिसीस रुग्णसंख्या विचारात घेता महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये(१) स्वामी विवेकानंद सांस्कृतिक भवन, से.१४ वाशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, से.०८, सी.बी.डी.अशा दोन ठिकाणी बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर डायलिसीस सुविधा सुरु करण्यात आली आहे. या केंद्राच्या माध्यमातून सन २०२५-२६ मध्ये साधारणत: ६५५२ रुग्णांना डायलिसीस सुविधेचा लाभ घेता येईल.

### कॅथलॅब व आय.सी.यू विभाग कार्यान्वित करणे

नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयामध्ये हृदयविकाराच्या रुग्णांवरील उपचाराकरिता सार्वजनिक रुग्णालय, ऐरोली येथे बाहययंत्रणेव्दारे कॅथलॅब व आय.सी.यू. विभाग कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कॅथलॅब आय.सी.यू. सुरू केल्यास हृदयविकार आलेल्या रुग्णांची Angiography करुन त्यांना पुढील उपचार सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल. पोषण पुनर्वसन केंद्र हे आरोग्य सुविधेतील एक युनिट आहे जिथे गंभीर तीव्र कुपोषण असलेल्या मुलांना दाखल केले जाते आणि त्यांचे व्यवस्थापन केले जाते. कुपोषणासारख्या समस्येवर मात करण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रात माता बाल रुग्णालय, तुर्भे येथे तीव्र कुपोषित बालकांचे उपचार तथा बालमृत्यू कमी करण्यासाठी पोषण पुनर्वसन केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

## पनवेल तालुक्यात 'जल जीवन मिशनचा' बोजवारा
### १३३ पैकी केवळ १४ योजना पूर्णत्वास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घरात नळातून पाणी पुरवठा करण्यासाठी राबविल्या जात असलेल्या 'जल जीवन मिशन' योजनेला घरघर लागल्याचे चित्र पाहायाला मिळत आहे. भाजपचे पनवेल येथील आमदारांनी ही योजना मार्गी लावावी यासाठी अनेकदा अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. अधिकाऱ्यांची कानउघडणी केली, मात्र त्याचा फारसा लाभ होताना दिसत नाही. पनवेल तालुक्यातील १३३ पैकी अवघ्या १४ योजना आतापर्यंत शंभर टक्के पूर्ण झाल्याची माहिती उजेडात आली आहे.

आदई गावातील ग्रामस्थांनी याविषय़ी पनवेल पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर ही माहिती समोर आली. आदई गावामध्ये इमारतींमध्ये वास्तव्याला आलेले रहिवासी दोन वर्षांपासून पनवेल पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडे पाणी पुरवठा योजना तातडीने राबविण्यासाठी पाठपुरावा करत आहेत. या रहिवाशांनी अनेकदा आंदोलने केली, बैठका घेतल्या मात्र सरकारी अधिकाऱ्यांची या कामाप्रती असलेल्या अनास्थेमुळे हे काम मार्गी लागू शकले नाही. या रहिवाशांना अधिकाऱ्यांकडून आश्वासने दिली जात होती. अखेर या रहिवाशांनी माहिती अधिकाराचा वापर करुन पंचायत समितीच्या जल जीवन मिशन योजनेची माहिती मिळवली.

> **कामांची स्थिती**
>
> जल जीवन मिशन योजनेतील १३३ पैकी ११ कामे ०.२५ टक्के झाली आहेत. तसेच २५ कामे ही २५ ते ५० टक्यांपर्यंत पूर्ण झाली आहेत. ४४ कामे ही ५० ते ७५ टक्के पूर्ण झाली आहेत. १६ कामे ७५ ते ९५ टक्के पूर्ण झाली आहेत. ६ कामे ही ९६ टक्के पूर्ण झाली आहेत. एक काम ९७ टक्के तर ३ कामे ९८ टक्के पूर्ण झाली आहेत. ९९ टक्के १३ कामे झाल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पनवेल तालुक्यामध्ये केंद्र व राज्य सरकारचे विविध मोठे प्रकल्प राबवले जात आहेत. मात्र प्रत्येक घरात नळातून पाणीपुरवठा अद्याप होत नाही. आदई गावात पाणी पुरवठ्याची जल जीवन मिशन योजना यशस्वीपणे राबवावी यासाठी रहिवासी मागील अनेक वर्षांपासून झटत आहेत. गावासाठी शासनाने ४ कोटी ५३ लाख १० हजार ६४७ रुपयांची योजना जाहीर केली. अद्याप गावात जलवितरण वाहिनीचे काम सुरूच झाले नाही. उंच साठवणूक जलकुंभाचे काम अवघे ४ टक्के झाले. हे ४ टक्के काम म्हणजे फक्त खोदकामाचा खड्डा मारला आहे. तसेच गुरुत्व वाहिनीचे काम ३८ टक्के झाले. भूस्तर टाकीचे काम ८५ टक्के झाले आहे. मागील अनेक वर्षात आदई गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम १२ टक्के एवढेच झाले आहे. ठेकेदाराला आतापर्यंत ३८ लाख रुपयांचे धावते देयकाप्रती दिल्याची माहिती उजेडात आली आहे.

## मीरा भाईंदर मधील कारवाई केलेले डान्स बार पुन्हा सुरू ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** मिरा भाईंदर महापालिकेने कारवाई केलेल्या २२ डान्स बार पैकी बहुतांश डान्स बार पुन्हा सुरू असल्याची बाब समोर आली आहे. हे डान्स बार वेळेची मर्यादा ओलांडून पहाटेपर्यंत सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहे. डान्सबारचे अनधिकृत बांधकाम, त्यातही गैरप्रकार आणि पहाटेपर्यंत सुरू असूनही पालिका तसेच पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याने संशय व्यक्त होत आहे.




**शहरातील अतिक्रमणाविरोधात कारवाई करणाऱ्या मिरा भाईंदर महापालिकेने डान्स बारच्या अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष केले होते. याबाबत तक्रारी येऊ लागल्याने अखेर मंगळवारी 'केम छो' आणि 'कॅटवॉक' या दोन डान्सबारच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली. सध्या आम्ही बारवर केली आहे. ज्या डान्सबारने अनधिकृत बांधकामे केली असतील त्यांची पाहणी करून कारवाई केली जाईल, अशी माहिती महापालिकेचे सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण विभाग) नरेंद्र चव्हाण यांनी दिली.**

मिरा भाईंदर शहरात जवळ पास ४५ ऑर्केस्ट्रा बार आहेत. यातील बहुतांश डान्सबार हे अनधिकृत असून ते नियमबाह्य पध्दतीने पहाटेपर्यंत चालविले जातात. त्यात महिला वेटरच्या नावाखाली बाराबालांकडून अश्लील कृत्य करवून घेतले जात आहे. यात महापालिका अधिकारी आणि बार चालकांमध्ये मोठा आर्थिक गैर- व्यवहार होत असल्याचा आरोप होत असतो. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या डान्स बारविरोधात कडक भूमिका घेत कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेने २२ डान्स बारवर कारवाई करून अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले होते. मात्र ही कारवाई वरवरची असल्याने यातील बहुतांश डान्स बार पुन्हा सुरू झाले आहेत.

### डान्स बार पहाटेपर्यंत

शहरातील अनधिकृत बांधकामे असेलल्या डान्स बारवरमध्ये गैरप्रकार होत असतात याशिवाय ते पहाटेपर्यंत सुरू असतात. मात्र पोलिसांकडून त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. डान्सबारच्या अनधिकृत बांधकामांवरही पालिकेकडून कारवाई कर्ण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. डान्सबारना रात्री दिड वाजेपर्यंत परवानगी आहे. त्यापेक्षा अधिक वेळ कुठलाही डान्सबार सुरू नसतो. तसा तो आढळल्यास कारवाई केली जाईल, अशी माहिती परिमंडळ- १ चे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली.

## अक्षय शिंदे मृत्यू प्रकरणात पोलिसांना दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात आरोपीच्या कोठडीतील मृत्यू प्रकरणात न्यायालयाने पाच पोलिसांविरुद्ध काहीसा दिलासा दिला आहे. 21 फेब्रुवारी रोजीच्या आदेशात सत्र न्यायालयाने आरोपींच्या कथित चकमकीवर शंका उपस्थित करणाऱ्या दंडाधिकाऱ्यांच्या अहवालाला स्थगिती दिली होती.




सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी. आर. देशपांडे यांनी सांगितले की, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) कडून आरोपीच्या कोठडीतील मृत्यूची चौकशी स्वतंत्रपणे सुरू राहील.

फेब्रुवारीमध्ये उष्णता वाढणार, आयएमडीने मुंबईत यलो अलर्ट जारी केला

बदलापूरच्या शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी अक्षय शिंदेला ऑगस्ट 2024 मध्ये अटक करण्यात आली होती. 23 सप्टेंबर 2024 रोजी, त्याला तळोजा तुरुंगातून कालीमंतन येथे चौकशीसाठी आणले जात असताना पोलिसांनी कथित चकमकीत ठार मारले. या चकमकीबाबत पोलिसांनी दावा केला की आरोपी अक्षय शिंदेने एका पोलिसाची बंदूक हिसकावून गोळीबार केला होता, त्यानंतर पोलिसांनी प्रत्युत्तर दिले.

शाळेतील दोन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली होती. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १२ आणि १३ ऑगस्ट रोजी चार आणि सहा वर्षांच्या मुलींसोबत घडली. वास्तविक, आरोपी अक्षय शिंदेला १ ऑगस्ट रोजी शौचालये स्वच्छ करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शाळेत भरती करण्यात आले होते.

## मी उद्योजक होणारच या कार्यक्रमात डॉ.विजय दहिफळे यांचा सन्मान




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** प्रतिनिधीमराठी भाषा गौरव दिन हा दिवस महाराष्ट्राचे जेष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रम यांच्या जन्मदिनी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते. आज सांस्कृतिक क्षेत्राबरोबर उद्योजकीय क्षेत्रात मराठी माणूस उल्लेखनीय कामगिरी करत आहे. उद्योजक क्षेत्रात ज्यांनी यशाचे शिखरे गाठले आहे आशा कर्तृत्ववान, अनुभवी, दूरदृष्टी असलेल्या व्यक्तीमत्वांना एका मंचावर आमंत्रित करून आजच्या तरुण वर्गाला उद्योग क्षेत्रात येण्यासाठी मार्गदर्शक व प्रेरणा मिळावी तसेच यशस्वी उद्योजकांना भेटण्याची, ऐकण्याची व त्यांच्या कडून उद्योगातील अनेक गोष्टी शिकण्याची तरुण वर्गाला संधी मिळाली या उदात्तहेतूने कर्तव्य फाउंडेशनच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आशा व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान व्हावा किंवा मराठी माणूस उद्योजक क्षेत्रात येऊन श्रीमंत व्हावा, भाषा अधिकाधिक समृद्ध व्हावी या अनुषंगाने मी उद्योजक होणारच या कार्यक्रमाचे दि. 25 फेब्रुवारी 2025 रोजी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज येथे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रसिद्ध विचारवंत व आरोग्य तज्ञ डॉ. विजय दहिफळे यांचे आरोग्य क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यामुळे डॉक्टर दहिफळे यांचे आरोग्य क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## राज्यातील दिव्यांग युवकांना रोजगार उपलब्ध करून देणार : देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, दि.२६ : राज्यातील दिव्यांग युवांना प्रशिक्षण देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचे आर्थिक स्वावलंबन होवून रोजगाराच्या संधी दिव्यांगानाही उपलब्ध होण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. या अनुषंगाने राज्यातील दिव्यांगाना कौशल्ययुक्त प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगारासाठी आगामी पाच वर्षांत नोंदणीकृत दिव्यांगांना युडीआयडी (Unique Disability ID) देणे. राज्य व केंद्र शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासन प्रयत्नशील असून यामध्ये स्वयंसेवी संस्था देखील दिव्यांगांच्या विकासासाठी पुढे येत आहेत.युथ फॉर जॉब्स' संस्था व राज्य शासन लवकरच सामंजस्य करार करणार आहे. रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी 'युथ फॉर जॉब्स' ही संस्था प्राथमिक टप्प्यात विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात शासनास सहकार्य करणार आहे आगामी काळात या कामाची व्यापकता वाढवून राज्यभर या कामाला राज्य शासन गती देणार आहे यामुळे दिव्यांग युवकांना रोजगार मिळतील असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नैसर्गिकरित्या किंवा अपघाताने अपंगत्व आलेल्या समाजातील दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी जाहीर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे यासाठी शासन नेहमी आग्रही असते.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारत' चे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना आणि निर्णय घेतले असून. कौशल्यपूर्ण शिक्षणातून अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास विभागाची स्थापना केली.याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य ही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय युवांच्या दृष्टीने घेत आहे.

### युथ फॉर जॉब्स' संस्था व राज्य शासनाचा सामंजस्य करार

'युथ फॉर जॉब्स' संस्थेच्या संस्थापिका तथा अध्यक्ष मीरा शेणॉय यांच्या संस्थेने केंद्र शासनाच्या सहकार्याने गडचिरोली जिल्हा प्रशासनासोबत दिव्यांग युवांना रोजगार वाढीसाठी अत्यंत उत्कृष्टरित्या काम केले आहे. ज्या व्यक्ती दिव्यांग आहेत त्यांचे दिव्यांगत्व लक्षात घेऊन त्यांना प्रशिक्षण दिले जाते.रोजगार मेळावे आयोजित करून दिव्यंगत्वाच्या प्रकारानुसार उद्योग क्षेत्रातील मागणी लक्षात घेवून आवश्यक असे मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाते. रोजगार देणाऱ्या खाजगी संस्थांमध्ये लाईफस्टाईल इंटरनॅशनल, आदित्य बिर्ला फॅशन, रिलायन्स ट्रेंड्स, आयआयएफएल, लक्ष हॉस्पिटल, मीलन कॉफी हाऊस, एचपीसीएल, बीपीसीएल, सहयोग मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, लोकल ऑटोमोबाईल डीलर्स, दिशा मेन पॉवर अँड सिक्युरिटी या वेगवेगळ्या खाजगी संस्था रोजगार देण्यासाठी पुढे येत आहेत. तसेच जे नोकरी करू शकत नाहीत. त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. हेच मॉडेल महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात सुरू करून दिव्यांगासाठी रोजगाराच्या व निर्माण होतील.आजच्या युवाकडे पदवी आहे पण उद्योग क्षेत्रात आवश्यक असलेले प्रशिक्षण देवून उद्योग क्षेत्राला कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण करून रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

राज्यात सर्व दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळावा आणि शासनाकडे त्यांचा अद्ययावत डाटाबेस करणे, यासाठी त्यांची १०० टक्के नोंदणी करणे. नोंदणीकृत दिव्यांगांना युडीआयडी (Unique Disability ID) देणे. दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ सहज मिळावा यासाठी या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहेत.दिव्यांगाना केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देणे यासाठी राज्य शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. उपक्रमासाठी शासनाबरोबर विदर्भ व उत्तर महाराष्ट्रात प्रथम टप्प्यात 'युथ फॉर जॉब्स' ही संस्था काम करणार आहे. राज्य शासन व स्थानिक जिल्हा प्रशासन सर्वोतोपरी सहकार्य करेल व संपुर्ण राज्यात केंद्र, राज्य व स्थानिक स्वयंसेवी संस्था या उपक्रमासाठी पुढे येवून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येतील असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांना आहे.

## –अहिल्याबाई होळकर मोफत पास योजना–
# भिवंडी बस आगारात अनागोंदी




### पासच्या पैशांची वसुली मात्र बस सुविधा पुरवण्याच्या नावाने बोंबाबोंब

### शाळा प्रशासनांकडून नाराजीचा सुर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
झिडके अंबाडी

मुलगी शिकली प्रगती झाली यासाठी शासन विविध योजना घेऊन येत असते त्यापैकीच ग्रामीण भागातील ५ वी ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींच्या शिक्षणात बाहेरगावी जाऊन शिक्षण घेताना अडथळे येऊ नयेत आणि त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून महाराष्ट्र शासनाने अहिल्याबाई होळकर योजनेतून एसटी बसमधून १००% मोफत प्रवासाची महत्वकांक्षी योजना सुरू केलेली आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळत असुन त्याचा निश्चित पणे फायदा होताना दिसत आहे.आणि या उपक्रमात एसटी महामंडळ अत्यंत महत्त्वाचे योगदान देत असल्याचे दिसून येत आहे.

परंतु भिवंडी एसटी आगार व्यवस्थापनाने या योजनेबाबत अत्यंत उदासीन भुमिका घेतली असुन योजनेसाठी मुलींना प्रोत्साहित करणे तर दूर, पण तालुक्यामधील १३ शाळा महाविद्यालयातील सुमारे ७५७ मुलींना मोफत पास वितरीत केले गेले आहेत परंतु त्यांना शाळेच्या येण्या जाण्याच्या वेळेत कोणतीही सुविधा पुरवत नसल्याचा प्रकार समोर आला असून शालेय विद्यार्थ्यांनींना खाजगी वाहनांतून असुरक्षित प्रवास करावा लागत आहे.

याबाबत लाभ घेत असलेल्या काही शाळा प्रशासनाने भिवंडी आगार व्यवस्थापनाकडे मुलींच्या होत असलेल्या गैरसोईबाबत तोंडी व लेखी स्वरूपात कळवले परंतु त्याची कोणतीही दखल घेत नसल्याने १) लाहोटी विद्यालय अनगाव २) खंबाळा विभाग हायस्कूल खंबाळा ३)गोपीनाथ पाटील हायस्कूल खानिवली यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन चे भिवंडी तालुका अध्यक्ष श्री.शांताराम गोविंद पाटील यांना लेखी पत्र देऊन या प्रकरणात लक्ष घालून सहकार्य करण्याची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने चौकशी करुन माहिती घेतली असता फक्त कागदावर मुलींना बस सुविधा पुरविली जाते मात्र प्रत्यक्षात शाळेच्या जाण्या येण्याच्या वेळेवर कोणतीही बस सुविधा पुरविली जात नसुन भिवंडी आगार शासनाकडून मोफत पास योजनेचे तिन महिन्याला सुमारे १० ते ११ लाख इतका निधी वसुल करत असल्याचे निदर्शनास आले आहे

याबाबत शांताराम पाटील यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन भिवंडी तालुक्याच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा.प्रतापजी सरनाईक, मा.व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई तसेच विभाग नियंत्रक महाराष्ट्र परिवहन विभागीय कार्यालय ठाणे यांसकडे लेखी तक्रार दाखल करून कारवाईची मागणी केली आहे तसेच भिवंडी एसटी आगाराने अहिल्याबाई होळकर योजनेतील मोफत पास धारक मुलींना बस सुविधा पुरविली नाही आणि शासनाच्या धोरणांना हरताळ फासण्याचे काम केले तर यापुढे माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन च्या वतीने तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

# श्री क्षेत्र घुटकेश्वर महादेव मंदिरांत भक्तांची अलोट गर्दी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : मोखाडा तालुक्यातील वाकडपाडा येथे महाशिवरात्र निमित्ताने श्री घुटकेश्वर महादेव मंदिरांत पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी दर्शन घेतले. येथील मंदिर समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन महाशिवरात्रीच्या निमित्ताने करण्यात आले होते. यावेळी मंदिर समिती अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मंदिर बांधकामासाठी सहकार्य करणाऱ्या देणगी दारांना सन्मान पत्र शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. सकाळ पासून च विविध गांवामधुन पायी दिंड्या भजन किर्तनाचा जयघोष करीत श्री घुटकेश्वराच्या दर्शनासाठी येत होत्या. महादेवाच्या पिंडीवर अभिषेक, महाआरती, स्वाध्याय परिवार कार्यक्रम,ह.भ.प.रघुनाथ महाराज झोले यांचे किर्तन रात्री भजन असा संपूर्ण दिवस चा कार्यक्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या भाविकांचे आभार मंदिर समिती चे अध्यक्ष प्रदीप वाघ यांनी मानले.

## संक्षिप्त

# जिल्हाध्यक्षांची आढावा बैठकीत दयानंद चोरघेंनी दिला जिल्ह्याचा आढावा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ ऍक्टिव्ह मोडवर आले असून आज टिळक भवन दादर, मुंबई येथे प्रदेश काँग्रेस कमिटी तर्फे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सर्व जिल्हाध्यक्षांची संघटनात्मक बाबींचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. संघटना बांधणीला प्रथम प्राधान्य देण्यात यावे असे आवाहन यावेळी त्यांनी सर्व जिल्हाध्यक्ष यांना केले .काँग्रेसचे ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद दादा चोरघे यांनी प्रांताध्यक्ष यांचा पारंपरिक आगरी पध्दतीने सत्कार करून ठाणे ग्रामीण जिल्ह्याचा आढावा दिला. जिल्ह्यातील पक्षाची सद्यस्थिती व आगामी काळातील कार्यक्रम याबाबत दयानंद चोरघे यांनी प्रांत अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना माहिती दिली. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ठाणे ग्रामीण जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे काम सुरू असल्याची माहिती प्रांताध्यक्ष सपकाळ यांना दिली व पुढील काळात ठाणे ग्रामीण जिल्ह्यामध्ये पक्ष मजबूत करण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली आम्ही ताकदीने काम करू असे आश्वासन जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दिले.

# निघोज कुंड रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटीकरणाची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

पारनेर : निघोज - राज्यात प्रसिद्ध असलेल्या जागृत व नवसाला पावणारी निघोज येथील श्री मळगंगा माता व जग प्रसिद्ध कुंड पर्यटन स्थळावरील रांजण खळगे आणि प्रसिद्ध असलेल्या कुंडाई देवस्थान रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असून दर्शनासाठी येणाऱ्या भाविक व पर्यटकांची कुचंबना होत आहे , या तीन ते साडे तीन किलो मीटर रस्त्याचे मजबुती करणासह सिमेंट काँक्रीटीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे .

निघोज मुख्य बस स्थानक ते कुंड पर्यटन स्थळापर्यंत साडे तीन किलो मीटर तर निघोज गाव ते पालखी मार्गाने हे अंतर तीन किलो मीटर भरते आहे . या आधी या मार्गाचे डांबरीकरण होवून अनेक वर्षे झाली असून या मार्गाने प्रवास करणे , सध्या खूपच जिकीरीचे झाले आहे . रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता आहे , असा प्रश्न पडतो . निघोज हे पर्यटन स्थळ म्हणून राज्यात व परराज्यात ही प्रसिद्ध असून येथील ग्रामदैवत असलेल्या श्री मळगंगा देवीच्या दर्शनासाठी व कुंडा वरील कुंडाई चे दर्शन , जगप्रसिद्ध रांजण खळगे , लोखंडी झुलता पूल आणि कुंडा पलीकडे असलेल्या टाकळी हाजी च्या श्री कुंडाई च्या दर्शनाकरिता यात्रे व्यतिरिक्त वर्षेभरात लाखो भाविक भक्त व पर्यटक निघोज नगरीला दुचाकी , चार चाकी , एस टी बस वा इतर वाहनांनी भेट देत असतात .

निघोज येथील श्री मळगंगा देवीचे यथासांग दर्शन घेवून भव्य व दिव्य मंदिराला प्रदशिक्षणा घातल्यावर तृप्त मनाने जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या कुंडाकडे प्रस्थान करतात , पण दुसऱ्याच क्षणी हा तोच रस्ता आहे ना , जो जगाच्या नकाशावर ठळकपणे कुंड पर्यटन स्थळाकडे प्रस्थान करताना दाखविला आहे , हा रस्ता इतका खराब , ओबड, धोबड झाला आहे की , या रस्त्यावरील डांबराचे अक्षरशः ठिगळे ठिगळे झाले आहे , खड्ड्यात रस्ता की , रस्त्यात खड्डा असा प्रश्न नक्कीच प्रत्येक भाविक भक्त , पर्यटक व ग्रामस्थांना ही पडतो , अंतर अवघे तीन ते साडे तीन किलो मीटर चे , पण प्रत्यक्षात प्रवास करायला लागल्या वर हेच अंतर खूप जास्त वाटते . आपले वाहन कोणत्या बाजूने वा कोणता खड्डा चुकवून सुरक्षित पणे चालवावे , असा प्रत्येक वाहन चालकाला प्रश्न पडला नाही , तर नवलच .

श्री मळगंगा देवी ची यात्रा जवळ आली असून एप्रिल च्या साधारणतः दुसऱ्या आठवड्यात हळद लावली जाते , तर दि . २१ ,२२ ,२३ व २४ एप्रिल मध्ये श्री मळगंगा देवी चा यात्रोत्सव असतो . यावेळी राज्य व परराज्यातून आलेल्या भाविक भक्तांची संख्या काही लाखांमध्ये असते . या यात्रेचे ग्रामस्थांच्या वतीने अतिशय निटनेटके नियोजन केले जाते , नियोजनात कोणत्याही प्रकारची कमतरता नसते . गतवर्षी यात्रा नियोजन अतिशय उत्कृष्ट झाले होते , त्यावेळी एकही चोरी झाली नव्हती . यात्रा दोन दिवस गावात भरते , तर दोन दिवस कुंडावर भरते , यावेळी प्रचंड गर्दी व रहदारी असते . अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज व पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी ला जोडणारा महत्त्वाचा व जवळचा मार्ग असल्याने सदोदित मोठी रहदारी असणारा मार्ग असल्याने या तीन ते साडे तीन किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण ऐवजी मजबूती करणासह सिमेंट कॉंक्रीटीकरण होणे , हे श्री मळगंगा देवीच्या एप्रिल मध्ये होणाऱ्या यात्रोत्सवाच्या आधी राज्यातील भाविक भक्त व पर्यटक आणि ग्रामस्थांसाठी अत्यंत गरजेचे आहे . हा रस्ता झाल्यास निघोज मधील व्यावसायिकां च्या व्यवसात तर भर पडेलच , त्याच बरोबर गावाच्या अर्थकारण वाढून गावाच्या वैभवात ही भर पडणार आहे . त्यामुळे गावातील सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून इच्छा शक्तीच्या जोरावर या विकासात्मक प्रश्नाकडे लक्ष द्यावे , अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे .

# कासणे येथील प्रश्न मंजूषा स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

पडघा: भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या कासणे येथील प्रश्न मंजुषा स्पर्धेला विद्यार्थी, पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

मराठी भाषा दिना निमित्ताने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा व स्पर्धा परीक्षा, स्कॉलरशिप पूर्व तयारी हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन शिक्षणप्रेमी भास्कर भोईर यांच्या वतीने शनिवारी शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रश्न मंजुषा स्पर्धा कासणे येथे घेण्यात आली. यामध्ये ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध प्रश्नांची अचूक उत्तरे दिली. सर्व विजयी विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व शैक्षणिक साहित्य भेट देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी उपस्थित ठाणे शहर पोलीस दलात कार्यरत असलेले गणेश दिवाणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व विविध शैक्षणिक मार्ग या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले, तर ॲड. मनोज दळवी यांनी स्पर्धा परीक्षा यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रामाणिक प्रयत्न व योग्य नियोजनाचा कानमंत्र दिला. यावेळी शिवसेना उपतालुका प्रमुख भगवान भोईर, सरपंच अजय घाटाल, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मंदा हालके, शंकर भोईर, पुंडलिक भोईर, रश्मी भोई व पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रिया मेस्त्री यांनी तर आभार पवार सर यांनी मानले यावेळी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राम सुरोशींचा पाठपुरावा

## कठडे दुरुस्तीचे काम पूर्ण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुरबाड महामार्गावरील रायते येथील उल्हासनदी पुलावरून क्रेन नदीपात्रात कोसळला होता त्यात पुलाचे कठडे -रेलिंग तुटून मोठे नुकसान झाले होते तसेच येथे अपघाताची शक्यता निर्माण झाली असता याबाबत राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष राम सुरोशी, विलास सोनवले, श्रीकांत तारमले यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग प्राधणीकरण यांना या पुलाची लवकरात लवकर दुरुस्तीची मागणी केली असता ती तात्काळ मान्य करून दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असून याबाबत जिल्हा उपाध्यक्ष रामभाऊ सुरोशी, विलास सोनावले, श्रीकांत तारमले यांनी सर्वांचे आभार मानले

# मुरबाड खांडपे बसला अपघात

## प्रसंगावधानामुळे सुदैवाने जीवितहानी टळली




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड ते खांडपे येथे दुपारी 2 वा. जाणारी मुरबाड एस.टी.महामंडळाची बस खांडपे येथिल खोल खदाणीच्या दरित जाण्यापासून थोडक्यात बचावली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की मंगळवारी नेहमीप्रमाणे दुपारी 2.वा. जाणारी मुरबाड ते खांडपे बस मुरबाड येथून प्रवाशांना घेऊन निघाली होती. सदर बस माल्हेड गाव सोडल्या नंतर खांडपे येथे जात असताना मोठा चढाव लागतो व उजव्या बाजूला रस्त्याला लागूनच खूप मोठी खदानीची दरी आहे. बस चढाव चढत असताना बसमधून अचानक चालकाला कसलातरी मोठा आवाज आला असल्याने बस चालक गोंधळून बसवरिल ताबा सुटला व बस रस्त्याच्या बाजूला गेली व अगदी दोन फुटावर 40 ते 50 फुटांची खोल दरी आहे जर बस तिथेच थांबली नसती तर बस खोल दरीत कोसळून मोठा अपघात झाला असता. बस मध्ये चार प्रवासी वाहक व चालक होते आमचे दैव बलवत्तर म्हणून सुदैवाने पुढचा प्रसंग टळला असल्याचे आगार प्रमुख योगेश मुसळे यांनी सांगितले असून जखमी प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असल्याचे सांगितले. दरम्यान हा रस्ता अरूंद असून कोणतेही संरक्षण कठडे या ठिकाणी बांधले नसून एका बाजूला चढाव व दुसऱ्या बाजुला खोल दरी असे असताना गेली अनेक वर्ष खांडपे गावचे ग्रामस्थ जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत सदर दगड खदानीची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचा ऑनलाईन टप्पा राबवा

## शिक्षक महासंघाची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांची प्रक्रिया कालबध्द पध्दतीने एप्रिल मे महिन्यात राबवली जाते मात्र लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता असल्याने ती राबवली गेली नाही. ही प्रलंबित बदली प्रक्रिया पवित्र पोर्टल शिक्षक भरती पूर्वी राबवावी.अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघानी केली आहे.

शैक्षणिक वर्ष 2024/25 ची सेवाजेष्ठता ग्राह्य धरावी, प्रचलित बदलीचे ऑनलाईन पद्धतीचे बदली धोरण कायम ठेवावे, यापूर्वी फॉर्म भरलेल्या शिक्षकांना ऑनलाइन बदली प्रक्रियेत प्राधान्यक्रम बदलण्यास संधी द्यावी व जून 2025 पात्र निकष लावून नव्याने पात्र होणाऱ्या शिक्षकांना ही आवेदन पत्र भरण्यास संधी उपलब्ध करून द्यावी..वर्षानुवर्षे आपल्या कुटुंबापासून दूर असलेल्या,पती पत्नी वेगवेगळया जिल्ह्यात कार्यरत असलेल्या महिला/पुरुष शिक्षकांना कौटुंबिक न्याय द्यावा अन्यथा आपल्या न्याय हक्कांसाठी व संविधानिक मागणीसाठी आपल्या कुटुंबासह बदली प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांना घेऊन आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येईल..त्यामुळे दुर्लक्षित होत असलेल्या या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन ऑनलाइन बदली प्रक्रियेचे आदेश निर्गमित करावेत अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने ग्रामविकास विभागाकडे करण्यात आलेली आहे.. निवेदनावर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजणे, राज्य प्रसिद्धीप्रमुख लहू राक्षे,राज्य पदाधिकारी व इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.

# रायगड जिल्ह्यात स्तनदा मातांसाठी ‘हिरकणी कक्ष’

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण: स्तनदा मातांसाठी स्वतंत्र हिरकणी कक्षाची सुविधा असावी, या शासकीय धोरणाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. ज्या शासकीय इमारतीत अद्याप हिरकणी कक्ष सुरू करण्यात आलेला नाही तेथे हिरकणी कक्ष तात्काळ स्थापन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील विविध कार्यालयात हिरकणी कक्ष कार्यान्वित करण्यात येत आहेत शासकीय कार्यालये आणि सर्वच महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी स्तनदा मातांसाठी ‘हिरकणी कक्ष’ उभारावेत हा 2012 सालचा शासन निर्णय. भारतीय स्तनपान प्रसारक मंडळाच्या महाराष्ट्र शाखेने याची शिफारस केली होती. यात 60X60 ची स्वतंत्र खोली स्तनपानासाठी असावी, तिथं पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पलंग- गादी, चांगले बेडशीट, तक्क्या- उशा, पंखा असावा, हिरकणी कक्षाच्या भिंतीवर स्तनपानाचे महत्त्व आणि शिशुपोषणाच्या शिफारशी इ.ची सचित्र माहिती असावी, अश्या शिफारशी होत्या.

# ओला व सुका कचरा व्यवस्थापन : कचरापेट्यांचे वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण: ग्रुप ग्रामपंचायत खांदारे - जामघर या ग्रुप ग्रामपंचायत वतीने तर सरपंच कविता कचरू जामघरे यांच्या पुढाकारातुन जामघर येथे ओला कचरा व सुका कचरा व्यवस्थापनासाठी मोफत कचरापेटी (डस्टबिन) वाटप करण्यात आले.

मुरबाड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत खांदारे - जामघर या ग्रामपंचायत हद्दीतील जामघर येथील घरांमधील होणाऱ्या ओला व सुका कचरा या कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य व्हावे यासाठी सरपंच कविता जामघरे यांच्या पुढाकाराने गावात कचरापेटीचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित महिलांना आगरीसेना मुरबाड तालुकाध्यक्ष ॲड. महेश भगत यांनी स्वच्छतेचे महत्व पटवून देत ओला कचरा व सुका कचरा व्यवस्थापन करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. याप्रसंगी सरपंच कविता जामघरे, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती लक्ष्मणजी भगत, माजी उपसरपंच बाळु जामघरे, मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक तथा माजी सरपंच अशोकजी भगत, धनंजय जामघरे, वृंदावन ग्रामसंघाच्या (सीआरपी) सपना भगत, ग्रा.पं. कर्मचारी योगिता भगत व महिला बचत गट महिला पदाधिकारी सदस्य, आदी महिला वर्ग उपस्थित होते.

# राज्यस्तरीय काव्य स्पर्धा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : वंजारी समाजातील नवोदित कवी यांना हक्काचं व्यासपीठ मिळावं तसेच त्यांना काव्य विषयक मार्गदर्शन साहित्य विषयक मार्गदर्शन करून अशा नव-कवींना,लेखकांना प्राथमिक धडे देऊन सारस्वतांच्या मुख्य प्रवाहात सामील होता यावे यासाठी अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समिती कल्याण यांच्यावतीने राज्यस्तरीय मराठी काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

इच्छुक कवींनी आपल्या स्वालिखित दोन कविता, पासपोर्ट साईज फोटो व अल्पपरिचयासह संयोजक प्रा अर्जुन उगलमुगले ८८५०३७८५६९ किंवा रमेश आव्हाड ९८७०३३४४५१ या क्रमांकावर पाठवाव्यात. आलेल्या कवितांपैकी पारितोषिक पात्र कवितांना संस्थेच्या बांधिलकी या वार्षिक अंकात प्रसिद्धी देण्यात येणार आहे. तसेच यातील निवडक कवितांचा प्रतिनिधी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा संस्थेचा मानस आहे.

स्पर्धे करिता प्रथम क्रमांकास २१०० रुपये रोख व सन्मानचिन्ह तसेच द्वितीय क्रमांक १५०० रुपये रोख व सन्मान चिन्ह आणि तृतीय क्रमांकास ११०० रुपये रोख व सन्मान चिन्ह आणि उत्तेजनार्थ पाच कवींना ५०० रुपये रोख सन्मानचिन्ह असे पारितोषिके देण्यात येणार असून परीक्षकांना लक्षवेधी वाटलेल्या पाच कवितांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त कवींनी दिनांक १० मार्च २०२५ पर्यंत आपल्या कविता पाठवाव्यात असे आवाहन संयोजकांनी केले असून स्पर्धेकरिता कोणतेही प्रवेश मूल्य नसून स्पर्धा विनामूल्य आहे.

# कान्होळ- बोरीवली ग्रामपंचायत मध्ये घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड: देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी गृहमंत्री अमित शहा यांचे प्रत्येक भारतियाला घरकुल मिळाले पाहिजे कोणीही घरापासून वंचित ही संकल्पना घेऊन त्या दृष्टीने योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात पुणे येथे अमित शहांच्या उपस्थितत प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्या अनुषंगाने मुरबाड तालुक्यातील कान्होळ बोरिवली ग्रामपंचायत येथील लाभार्थ्यांना आमदार किसनजी कथोरेंच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने व सरपंच रेश्माताई घरत यांच्या पाठपुराव्याने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सरपंच रेश्माताई व बाळाशेट घरत यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना सरपंच रेश्मा ताई घरत यांनी माझ्या ग्रामपंचायत मध्ये कान्होळ व बोरिवली अशी दोन गाव आहेत दोन्ही गावांमध्ये एससी, एन .टी, एसटी व ओबीसी समाजाचे लोक राहत असून आमदार किसनजी कथोरे साहेब यांनी सर्व समाजातील घटकांपर्यंत आत्तापर्यंत 145 घरकुल मंजूर केली असल्याने लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे उत्साहाचं वातावरण दिसत आहे त्याचबरोबर दोन्ही गावातील रस्ते, पाणी, लाईट, जि प. शाळा इमारत, गणेश घाट, सभामंडप, प्रवेशद्वार यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला असल्याबद्दल आमदार किसन कथोरेंचे आभार मानले आहेत.







‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024